जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात आता फौंड्री तंत्रज्ञान अभ्यासक्रम!


## नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान, स्टार्टअप्सचा समावेश; विद्यार्थ्यांना शंभर टक्के नोकरीची हमी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात रसायनशास्त्र अधिविभाग व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमेन (कोल्हापूर चॅप्टर) यांच्या वतीने पदव्युत्तर स्तरावरील 'फौंड्री तंत्रज्ञान' हा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे फौंड्री उद्योगास नवीन चालना मिळणार आहे.

कोल्हापूर हे फौंड्री उद्योगासाठी देशभर प्रसिद्ध असून, जवळपास ५०० हून अधिक फौंड्री उद्योग कोल्हापूर व जवळपास कार्यरत आहेत. ऑटोमोबाईल्स व इतर गाड्यांना लागणारे विविध लाखो पार्टस्, इंजिन ऑईल्सचे पार्टस्, शेती अवजारे यांना लागणारा कच्चा माल आदी सर्व या उद्योगातून तयार केला जातो. दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल उद्योगामध्ये होते. अलीकडे हा उद्योग कुशल मनुष्यबळाचा अभाव, नवनवीन तंत्रज्ञानाच्या जाणकारांच्या कमतरतेमुळे अडचणींना सामोरा जात आहे. म्हणूनच इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमेन (कोल्हापूर चॅप्टर) या संस्थेने पुढाकार घेऊन विद्यापीठाला अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव दिला. त्यानुसार विद्यापीठात हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

अभ्यासक्रमाची रचना नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार असून, विद्यापीठ व फौंड्री उद्योग यांच्या समन्वयातून तो विद्यार्थ्यांना शिकविला जाणार आहे. अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना फौंड्री उद्योगातील विविध कौशल्ये दिली जाणार आहेत. अभ्यासक्रमामध्ये फौंड्री उद्योग व्यवसायाशी संबंधित नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान, स्टार्टअप्स इत्यादींचा समावेश केला असल्यामुळे काही विद्यार्थी स्वबळावर फौंड्री उद्योग सुरू करू शकतात.



> फौंड्री क्षेत्रामध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअरची सुवर्णसंधी आहे. या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. अभ्यासक्रमास इच्छुकांनी प्रवेश घ्यावा.
>
> **- प्रा. डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JAN 2024
सकाळ

# कौशल्याधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करा : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. ७ : 'शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाजातील घटकांना शैक्षणिक क्षेत्रात सामावून घेण्यासाठी दूरशिक्षण केंद्राने प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू करावेत', अशी सूचना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केली.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे नवीन शैक्षणिक वर्षात सुरू केल्या जाणाऱ्या ऑनलाइन एम.बी.ए अभ्यासक्रमाबाबत आयोजित आढावा बैठकीमध्ये त्यांनी मार्गदर्शन केले. या वेळी वाणिज्य अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, समन्वयक डॉ. कृष्णा पाटील, वैभव पाटील उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'दूरशिक्षण केंद्राने सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणातील रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम समाजातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांसाठी विषयनिहाय सुरू करावेत. त्यासाठी अधिकार मंडळांची मान्यता घ्यावी. अभ्यासक्रम मर्यादित कालावधीचे असावेत. अभ्यासक्रम हे समाजातील विविध घटकांच्या दैनंदिन व्यवहारातील जीवनाशी निगडीत असावेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JAN 2024

पुढारी

# दूरशिक्षण केंद्राने कौशल्याधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करावेत

- कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठात अभ्यासक्रम आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राने समाजातील शिक्षणापासून वंचित घटकांना शैक्षणिक क्षेत्रात सामावून घेण्यासाठी प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू करावेत, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे नवीन शैक्षणिक वर्षात होणाऱ्या ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

कुलगुरू शिर्के म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणातील रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम समाजातील शिक्षणापासून वंचित घटकांना विषयनिहाय सुरू करावेत, जेणेकरून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. हे अभ्यासक्रम मर्यादित कालावधीचे असावेत. प्रत्येकाचा व्यक्तिमत्त्व विकास व ज्ञानावर आधारित कौशल्ये विकसित झाली पाहिजेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अधिकार मंडळाची मान्यता घेऊन अभ्यासक्रम सुरू करावेत, अशा सूचना त्यांनी केल्या. वैभव पाटील यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JAN 2024

पुण्यनगरी

# 'दूरशिक्षण'ने कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरु करावेत : कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र समाजातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांना शैक्षणिक क्षेत्रात सामावून घेण्यासाठी प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरु करावेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे नवीन शैक्षणिक वर्षात सुरु करण्यात येणाऱ्या ऑनलाइन एमबीए अभ्यासक्रमाबाबत आयोजित आढावा बैठकीमध्ये ते बोलत होते. डॉ. शिर्के म्हणाले, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, शेतकरी, उद्योजक बंदीजन पदवी व पदवीव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिले जातात. दूरशिक्षण केंद्राने सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणातील रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम समाजातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांना विषयनिहाय सुरु करावेत. ज्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. प्रास्ताविक वैभव पाटील यांनी केले. तर आभार उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी मानले. यावेळी वाणिज्य अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, समन्वयक डॉ. कृष्णा पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JAN 2024

पुण्यनगरी

# विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्रातर्फे व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र सभागृहात मंगळवार दि. १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमात बिगर शासकीय संघटना संबंधी या विषयातील तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे हस्ते होणार आहे, अशी माहिती, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. एस. एस. महाजन व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JAN 2024
पुढारी

# 'दूरशिक्षण' केंद्राच्या वतीने आजपासून पीएच.डी. प्रवेश परीक्षा तयारी कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएच.डी. प्रवेश परीक्षेसाठी ८ जानेवारीपासून पीएच. डी. प्रवेश परीक्षा तयारी कार्यशाळा ऑनलाईन पद्धतीने आयोजित केल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

विद्यापीठाच्या वतीने पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेसाठी २०२३-२४ साठी इच्छुक पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. ८ ते १२ जानेवारीदरम्यान ही कार्यशाळा दोन भागांत होणार आहे.

पहिल्या भागात 'परीक्षेविषयी सामान्य माहिती व संशोधन पद्धत' यावर समन्वयक डॉ. के. बी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या भागात नाईट कॉलेजचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. अरुण शिंदे (मराठी), सातारा येथील शिवाजी कॉलेजचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एस. पाटील (राज्यशास्त्र), अर्थशास्त्र विभागप्रमुख



शिवाजी विद्यापीठातून

प्रा. डॉ. व्ही. पी. कट्टी (अर्थशास्त्र), समाजशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. जगन कराडे (समाजशास्त्र), प्रा. डॉ. भारतभूषण माळी (इतिहास), चिपळूण येथील डी. बी. जे. कॉलेजच्या गणित अधिविभागातील प्रा. डॉ. एम. एस. बापट (गणित), वाणिज्य अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव (वाणिज्य, व्यवस्थापन, अकौंटन्सी मार्गदर्शन करतील.

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभागासाठी https:/// forms. gle/ yqjqC1 RkzMdrA4 Yn6 गुगल फॉर्मद्वारे नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

08 JAN 2024 क्रांतीसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उर्जा संशोधन काळाची गरज:प्रा.पी.एस.पाटील




कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठातील भौतिक शास्त्र विभागाने ४ जानेवारी २०२४ रोजी उच्चशिक्षणातील आंतरराष्ट्रीय संधी या व्याख्यानाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा उद्देश उच्चशिक्षणातील संधींची माहिती देणे हा होता. कार्यक्रमाचे वक्ते प्रा. दीपक डुबल, क्वीन्सलँड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, ऑस्ट्रेलिया यांनी त्यांचा शैक्षणिक प्रवास, सध्याचे संशोधन आणि उपलब्ध असलेल्या संशोधन आणि उच्चशिक्षणातील विविध संधींवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रा. दुबल यांचा परिचय अधिविभाग प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी करून दिला. भौतिक शास्त्र विभाग ज्ञान वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी मौल्यवान संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचें नमूद केले कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्र-कुलगुरू,प्रा.पी.एस. पाटील होते. त्यांच्या हस्ते प्रा. दुबल यांचा सत्कार झाला. प्रा. पी. एस. पाटील, यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवीकरणीय ऊर्जा निर्मिती व साठवण क्षेत्रातील नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोतांच्या संशोधनाच्या महत्त्वावर भर दिला आणि विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या क्षेत्रात मास्टर्स बनण्यासाठी नव्हे तर प्रभुत्व मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रवृत्त केले. प्रा. के. वाय. राजपुरे यांनी प्रा. डुबल यांच्या शैक्षणिक कारकिर्दीचे कौतुक करून प्रेरणादायी टिपण्णी दिली. डॉ. उमेश चौगले यांनी चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी सर्वांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक करून आभार मानले. नेहा आणि साधना या भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचे कुशलतेने सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात एलबीएस सातारा, राजाराम कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, एसजीयू अतिग्रे, सायन्स कॉलेज सोलापूर, आदींसह कॅम्पसमधील आणि बाहेरील विविध विभागांतील विद्यार्थी, प्राध्यापक आणि अधिविभाग प्रमुख यांचा सक्रिय सहभाग होता. औपचारिकतेनंतर झालेल्या संवादात्मक सत्राला चांगला प्रतिसाद मिळाला आणि विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनासाठी कार्यक्रमाचे खूप कौतुक झाले. सदर कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील आणि कुलसचिव मा. व्ही. एन. शिंदे यांच्या पूर्ण पाठिंब्यामुळे आणि प्रोत्साहनामुळेच हे सर्व शक्य होत आहे असे भौतिक शास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी सांगितले

जनसंपर्क कक्ष
08 JAN 2024
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डुबल यांनी उलगडल्या उच्चशिक्षणातील संधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाने आयोजित करण्यात आलेल्या 'उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीय संधी' या व्याख्यानात ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. दीपक डुबल यांनी सध्याचे संशोधन आणि उच्चशिक्षणातील विविध संधींवर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रा. प्रमोद पाटील होते. अधिविभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. के. वाय. राजपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. उमेश चौगले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JAN 2024
सकाळ

# 'बर्ड्स ऑफ कोल्हापूर'ची विद्यापीठात गणना

कोल्हापूर : येथील बर्ड्स ऑफ कोल्हापूर आयोजित कोल्हापूर पक्षी गणनेच्या पाचव्या हंगामातील सातव्या भागाची पक्षी गणना आज सकाळी शिवाजी विद्यापीठात झाली. त्यासाठी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे सहकार्य लाभले. अभिषेक शिर्के, पृथ्वीराज सरनोबत, मंदार रुकडीकर, ऋतुजा पाटील, सचिन कांबळे यांनी पक्षी गणनेचे काम केले. त्यांना डॉ. आसावरी जाधव यांची मदत, तर स्वप्नील पवार, प्रणव देसाई, सतपाल गंगलमाले आणि हिमांशू स्मार्त यांचे मार्गदर्शन लाभले.

0 8 JAN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीकरिता जयसिंगपूर येथील अरविंद पाटील यांनी त्यांच्या पत्नी सुलोचना पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १ लाख ११ हजार रुपये देणगी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शाल, ग्रंथ व विद्यापीठाचे बोधचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी त्यांचे आभार मानले. यावेळी प्रा. विजय ककडे, अविनाश कुंभोजकर, प्रतिभा कुंभोजकर, ज्योती पाटील, विपुल पाटील उपस्थित होते.